जनसंपर्क कक्ष
शिवाजी-विद्यापीठ, कोल्हापूर
23 JAN 2018
तरुण भारत

# रसायनशास्त्र विषयाच्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे १ फेब्रुवारीला उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागात 'ॲडव्हान्सेस इन केमिकल सायन्सेस' या विषयावर तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद दि.१ ते ३ फेब्रुवारी या कालावधीत वि. स. खांडेकर भवनमध्ये होणार आहे. देश-विदेशांतून तीनशेहून अधिक संशोधकांसह नामवंत आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञांचा यामध्ये सहभाग आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, या परिषदेत रसायनशास्त्र विज्ञानातील प्रगती, आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरू असणारे संशोधन यांविषयी चर्चा करण्यात येणार आहे. तसेच रसायनशास्त्रातील संशोधन, जागतिक स्तरावरील प्रचलित घडामोडी व संशोधनातील चालू घडामोडींची अभ्यासकांना ओळख व्हावी आणि समाजोपयोगी संशोधनास चालना मिळावी, हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे. या परिषदेस आंतरराष्ट्रीय ख्यातीचे डॉ. डी. पी. पांडा (क्लेम्सन विद्यापीठ, अमेरिका), प्रा. शेषनाथ भोसले (ऑस्ट्रेलिया), प्रा. पॉंग वे फॉंग, डॉ. शिंग व्हॉं झिंग, प्रा. लिंग यॉंग चेन (तैवान), डॉ. लिन डेनॅनी (स्कॉटलंड), प्रा. मिंग्स लॉंग (चीन), प्रा. डिऑग सोहन (दक्षिण कोरिया) तसेच भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर (बीएआरसी) येथील डॉ. जालीधर याखमी, डॉ. भास्कर साठे (औरंगाबाद), डॉ. संजीव कट्टी (रिलायन्स इंडस्टीज लिमिटेड, मुंबई), प्रा. बादल मंडल (व्हीआयटी, चेन्नई), प्रा. प्रेमकुमार सी.ई. (सी.आर.आय., चेन्नई), प्रा. पी.पी. वडगावकर (एनसीएल, पुणे) आदी शास्त्रज्ञ या परिषदेत सहभागी होऊन मार्गदर्शन करणार आहेत. तसेच एम. एस्सी. व संशोधक विद्यार्थीही सहभागी होणार आहेत.



- कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती
- आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधनाची होणार चर्चा

समन्वय समितीचे डॉ. अनिल घुले म्हणाले, १ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता वि. स. खांडेकर भवनमध्ये कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होणार आहे. तर रिलायन्स इंडस्ट्रीजचे वरिष्ठ उपाध्यक्ष डॉ. संजीव कट्टी यांचे या प्रसंगी बीजभाषण होईल.

तैवानच्या नॅशनल सिंग हुवा विद्यापीठाचे प्रा. लिंग योंग चेन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. सहभागी संशोधकांचे भित्तीपत्रक व मौखिक सादरीकरण होईल. २ फेब्रुवारी रोजी ऑस्ट्रेलिया, तैवान, येथील नामवंत शास्त्रज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने होतील. ३ फेब्रुवारी रोजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली पारितोषिक वितरण व सांगता समारंभ होईल. यावेळी विभागप्रमुख डॉ. जी. एस. गोकावी, डॉ. संजय कोळेकर, डॉ. एस. डी. डेलेकर, डॉ. एस. पी. हांगिरगेकर, डॉ. आर. एस. साळुंखे, डॉ. के. एम. गरडकर, जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर, प्रशांत झंपले आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JAN 2018
लोकमत

**एक फेब्रुवारीला प्रारंभ : आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञ, संशोधकांचा सहभाग : देवानंद शिंदे**

# शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागात 'ॲडव्हान्सेस इन केमिकल सायन्सेस' या विषयावर दि. १ ते ३ फेब्रुवारीदरम्यान आंतरराष्ट्रीय परिषद होणार आहे. त्यात रसायनशास्त्र विज्ञानातील प्रगती, आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरु असणारे संशोधनाबाबत चर्चा होणार आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेस देश-विदेशांतून तीनशेहून अधिक संशोधक, आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञ सहभागी होणार आहेत, अशी माहिती कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी येथे सोमवारी दिली.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, रसायन शास्त्रातील संशोधनातील चालू घडामोडींची अभ्यासकांना ओळख व्हावी, या उद्देशाने ही परिषद आयोजित केली आहे. त्यामध्ये डी. पी. पांडा (क्लेम्सन विद्यापीठ), शेषनाथ भोसले (ऑस्ट्रेलिया), पाँग वे फाँग, शिंग व्हॉ झिंग, लिंग याँग चेन (तैवान), लिन डेनॅनी (स्कॉटलंड), मिंग्स लाँग (चीन), डिऑग सोहन (दक्षिण कोरिया), जांलीधर याखमी (भाभा एटोमिक रिसर्च सेंटर), भास्कर साठे (औरंगाबाद), बादल मंडल (व्हीआयटी, चेन्नई), प्रेमकुमार सी.ई. (सी.आर.आय., चेन्नई), पी. पी. वडगांवकर (एनसीएल, पुणे) आदी मार्गदर्शन करणार आहेत. विद्यापीठ संलग्नित एम. एस्सी. च्या विद्यार्थ्यांसाठी या परिषदेत मुक्त प्रवेश मिळणार आहे.

या पत्रकार परिषदेस रसायनशास्त्र अधिविभागप्रमुख जी. एस. गोकावी, एस. डी. डेळेकर, पी. व्ही. अनभुले, के. एम. गरडकर, एस. बी. हंगीरेकर, आर. एस. साळुंखे, एस. ए. संकपाळ उपस्थित होते.

## शास्त्रज्ञांची व्याख्याने



दि. १ फेब्रुवारीला सकाळी दहा वाजता वि. स. खांडेकर भवन येथे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होईल. यावेळी रिलायन्स इंडस्ट्रीजचे वरिष्ठ उपाध्यक्ष डॉ. संजीव कट्टी यांचे बीजभाषण होणार असल्याचे परिषदेच्या समन्वय समितीचे डॉ. अनिल घुले यांनी सांगितले. ते म्हणाले, तैवानच्या नॅशनल त्सिंग हुवा विद्यापीठाचे प्रा. लिंग याँग चेन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असतील. त्यानंतर विविध सत्रांमध्ये आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन, सहभागी संशोधकांचे भित्तीपत्रक व मौखिक सादरीकरण होईल. दि २ फेब्रुवारीला ऑस्ट्रेलिया, तैवान, येथील शास्त्रज्ञांची व्याख्याने होतील. दि. ३ फेब्रुवारीला प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली परिषदेचा समारोप होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JAN 2018
सकाळ

# रसायनशास्त्र अधिविभागातर्फे आंतरराष्ट्रीय परिषद : डॉ. शिंदे

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातर्फे 'ॲडव्हान्सेस इन केमिकल सायन्सेस' विषयावर १ ते ३ फेब्रुवारी दरम्यान आंतरराष्ट्रीय परिषद होत आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली. वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये परिषद होईल.

डॉ. शिंदे म्हणाले, ''रसायनशास्त्रातील संशोधन, जागतिक स्तरावरील घडामोडी, संशोधनातील चालू घडामोडींची अभ्यासकांना ओळख व्हावी व समाजोपयोगी संशोधनास चालना मिळावी, या उद्देशाने परिषदेचे आयोजन केले आहे. त्यात रसायनशास्त्र विज्ञानातील प्रगती, आंतरराष्ट्रीय घडामोडींवर चर्चा होणार आहे. देश-विदेशातून तीनशेहून अधिक संशोधकांसह नामवंत आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञ सहभागी होणार आहेत. अमेरिकेतील क्लेमसन विद्यापीठातील डॉ. डी. पी. पांडा, ऑस्ट्रेलियातील प्रा. शेषनाथ भोसले, प्रा. लिंग यॉग चेन, प्रा. पॉग वे फॉग, डॉ. शिंग व्हॉ झिंग, डॉ. लीन डेनॅनी, प्रा. मिंग्स लॅग, प्रा. डिआँग सोहन, भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटरमधील डॉ. जालिंधर याखमी, डॉ. भास्कर साठे, प्रा. बादल मंडल, प्रा. प्रेमकुमार, प्रा. पी. पी. वडगावकर परिषदेस उपस्थित राहणार आहेत. परिषदेत सहभागी संशोधकांचे भित्तीपत्रक व मौखिक सादरीकरण होणार आहे.''

प्रा. डॉ. ए. व्ही. घुले म्हणाले, ''कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते परिषदेचे उद्‌घाटन होणार आहे. नॅशनल सिंग हुवा विद्यापीठातील प्रा. लींग योंग चेन हे प्रमुख पाहुणे, तर रिलायन्स इंडस्ट्रिजमधील डॉ. संजीव कट्टी अध्यक्षस्थानी आहेत.'' पत्रकार परिषदेस प्रा. जी. एस. गोकावी, प्रा. एस. डी. डेळेकर, प्रा. पी. व्ही. अनभुले, प्रा. के. एम. गाडकर, प्रा. एस. बी. हंगीरिकर, प्रा. आर. एस. साळुंखे, डॉ. एस. ए. संकपाळ उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JAN 2018
Times of India

# SUK to host 3-day int'l conference

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) will host a three-day international conference on advances in chemical sciences from February 1.

According to a SUK official, five international faculties are going to deliver their speeches during the conference on its campus. "The faculties are from China, Scotland, South Korea, America and Taiwan," he said.

A V Ghule, convenor of the conference, said for the said event over 300 researchers from across the country and some accompanying international speakers will be present at the venue.

Talking about the conference, he said that the primary goal is to provide an opportunity for wide-ranging discussion on innovative research in various fields of chemical sciences.

"In recent times, the progress of research in chemical sciences has been phenomenal, leading to emergence of many sub-disciplines such as material science, nano-science and technology, chemical biology and others. The overlap of these disciplines results in the diverse applications of science to humanity," he said.

While Devanand Shinde, vice-chancellor of SUK and acting vice-chancellor of the Mumbai University, said these events provide a good platform to establish relationships with foreign universities and can lead to generation of MoUs.

He added that the SUK has a good campus and it can accommodate international faculty members without any issue.

Shinde said that there will be an easy access for the students of SUK-affiliated colleges for this conference. For participation in the conference, the fee for industry delegates is Rs 8,000, for faculties it's Rs 5,000 and for research scholars it is Rs 3,000.

2 3 JAN 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सुराज्यासाठी शिक्षणप्रसार हाच एकमेव मार्ग

## डॉ. बी. एम. हिर्डेकर : आजीवन अध्ययनतर्फे डॉ. बापूजी साळुंखे व्याख्यानमाला



कोल्हापूर : व्याख्यानमालेत बोलताना डॉ. बी. एम. हिर्डेकर. शेजारी कुलसचिव डॉ. नांदवडेकर, प्राचार्य अभयकुमार साळुंखे आदी.

कोल्हापूर, ता. २२ : स्वातंत्र्याचे सुराज्य बनविण्यासाठी शिक्षणप्रसार हाच एकमेव मार्ग आहे. त्याकरिता ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार या तत्त्वज्ञानाने महाराष्ट्राचा शैक्षणिक आराखडा डॉ. बापूजी साळुंखे यांनी तयार केला. स्वतःच्या विचाराने एक सामान्य शिक्षक ते शिक्षण संस्था असा महाराष्ट्रभर गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रसार त्यांनी केला, असे प्रतिपादन डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी



साळुंखे व्याख्यानमालेत केले. शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत आयोजित '२१ व्या शतकातील उच्चशिक्षणासमोरील आव्हाने' या विषयावर ते बोलत होते. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर अध्यक्षस्थानी होते.

डॉ. हिर्डेकर म्हणाले, की २१ व्या शतकासमोरील शैक्षणिक आव्हाने पेलताना डॉ. आप्पासाहेब पवार, कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. बापूजी साळुंखे यांनी उभे केलेले शैक्षणिक प्रयोग निश्चितपणे आपल्याला उपयोगी पडतील. आपण शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची कार्यसूत्री तयार केली पाहिजे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना मागेल त्या वेळी मागेल त्या ठिकाणी शिक्षण पोहोचविले पाहिजे. हीच २१ व्या शतकाची गरज आहे.

प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी केला. डॉ. सुमन बुवा यांनी स्वागत केले आणि पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रा. यशोधन बोकील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JAN 2018
पुण्यनगरी




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत आयोजित '२१ व्या शतकातील उच्च शिक्षणासमोरील आव्हाने' या विषयावर बोलताना डॉ. डॉ. बी. एम. हिर्डेकर.

# बापूजी साळुंखे यांनी राज्याचा शैक्षणिक आराखडा बदलला

## डॉ. बी. एम. हिर्डेकर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** स्वातंत्र्याचे सुराज्य बनविण्याकरिता शिक्षण प्रसार हाच एकमेव मार्ग आहे. त्यासाठी ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार या तत्त्वज्ञानाने महाराष्ट्राचा शैक्षणिक आराखडा डॉ. बापूजी साळुंखे यांनी तयार केला. स्वतःच्या विचाराने सामान्य शिक्षक ते शिक्षण संस्था असा महाराष्ट्रभर गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रसार केला. आज अनेक पदांवर विवेकानंद शिक्षण संस्थेतील विद्यार्थीवर्ग कार्यरत आहे. हीच बापूजी साळुंखेंची दूरदृष्टी आहे, असे प्रतिपादन डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व्याख्यानमालेत केले.

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत आयोजित '२१ व्या शतकातील उच्च शिक्षणासमोरील आव्हाने' या विषयावर डॉ. हिर्डेकर बोलत होते. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर अध्यक्षस्थानी उपस्थित होते.

डॉ. बी. एम. हिर्डेकर म्हणाले, २१ व्या शतकासमोरील शैक्षणिक आव्हाने पेलताना डॉ. आप्पासाहेब पवार, कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. बापूजी साळुंखे यांनी उभे केलेले शैक्षणिक प्रयोग निश्चितपणे आपल्याला उपयोगी पडतील. आपण शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची कार्यसूत्री तयार केली पाहिजे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना मागेल त्या वेळी मागेल त्या ठिकाणी शिक्षण पोहोचवले पाहिजे. हीच २१ व्या शतकाची गरज आहे. चीन, दक्षिण कोरीया, फिनलँड व इंग्लंड, अमेरिका यांच्याबरोबरीने भारतीय शिक्षण आव्हान उभे करू शकते; कारण या विकसित देशांमध्ये भारतातून गेलेलेच विद्यार्थी आघाडीवर काम करत आहेत. भारतीय विद्यापीठांमध्ये कार्यपद्धतीत योग्य ते क्रांतिकारक बदल करून आपण हे आव्हान पेलू शकतो. याबद्दल परदेशातील शिक्षणतज्ज्ञांना खात्री आहे. या सर्व गोष्टींचा दूरदर्शीपणे डॉ. बापूजी साळुंखे यांनी विचार केला होता, म्हणूनच त्यांनी आपल्या संस्थेचे ब्रीदवाक्य 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार' ठेवले. आज यात यापुढील पिढीतील प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण हा विचार जोडला आहे.

कार्यक्रमाला प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी मार्गदर्शन केले. बापूजींबद्दल विद्यापीठाने दाखवलेल्या या कृतज्ञतेबद्दल धन्यवाद दिले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी केला. डॉ. सुमन बुवा, प्र. संचालक, विस्तार विभाग यांनी स्वागत व पाहुण्यांची ओळख करून दिली. सूत्रसंचालन प्रा. यशोधन बोकील यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JAN 2019
सकाळ

# कमकुवत महाविद्यालयांना शिफारसीनुसार अनुदान

कोल्हापूर, ता. २२ : आर्थिकदृष्ट्या कमकुवत महाविद्यालयांना अर्थसहाय्य योजनेंतर्गत संलग्नित महाविद्यालयांना छाननी समितीने केलेल्या शिफारसींनुसार अनुदान देण्यास व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत आज मान्यता देण्यात आली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.

राजारामबापू कॉलेज ऑफ शुगर टेक्नॉलॉजीमध्ये टेक्नॉलॉजी बिझनेस इन्क्युबेशन सेंटर सुरू करण्यास, तर मराठी अधिविभाग व मराठी विज्ञान परिषदेतर्फे मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून विज्ञानकथा कार्यशाळा घेण्यास मान्यता देण्यात आली. २०१६-१७ चे वार्षिक लेखे, ताळेबंदपत्रक, लेखापरीक्षण अहवाल, वित्त व लेखा विभागाने अधिसभेस केलेली शिफारस मान्य करण्यात आली.



**३७ जणांना पदोन्नती**

शिवाजी विद्यापीठातील खुल्या प्रवर्गातील ३७ जणांना विविध पदांसाठी आज पदोन्नती देण्यात आली. उपकुलसचिव, सहायक अधीक्षक, वरिष्ठ सहायक, लॅब टेक्निशियन, हवालदार, हेड माळी पदांकरिता पदोन्नती प्रक्रिया झाली. ही पदोन्नती अनेक वर्षे रखडली होती. पदोन्नतीनंतर संबंधितांना नियुक्तीची पत्रे देण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JAN 2018
पुढारी

# आर्थिकदृष्ट्या कमकुवत महाविद्यालयांना अनुदान

## विद्यापीठाची पहिली व्यवस्थापन परिषद बैठक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आर्थिकदृष्ट्या कमकुवत महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी छाननी समितीने केलेल्या शिफारशीनुसार शिवाजी विद्यापीठाच्या सोमवारी झालेल्या पहिल्या व्यवस्थापन परिषद बैठकीत अनुदान देण्यास मान्यता दिली. यासह सामंजस्य करारासंदर्भात प्रस्तावांचे निर्णय घेण्यात आले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.



मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून 'विज्ञानकथा' या विषयावर कार्यशाळा घेण्याचा निर्णय घेण्यात आला. २०१६-१७ सालातील लेखा विभागाने केलेली ताळेबंदपत्रक, लेखापरिक्षण अहवाल शिफारशीस मान्यता देण्यात आली. नॅशनल तैवान युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजी तसेच नॅशनल त्सींग युनिव्हर्सिटी, तैवान यांच्यात सामंजस्य करारा करण्यास मान्यता बैठकीत देण्यात आली. राजारामबापू कॉलेज ऑफ शुगर टेक्नॉलॉजी महाविद्यालयांत टेक्नॉलॉजी बिझनेस इनक्युबेशन सेंटर सुरू करण्यासाठी मान्यता देण्यात आली. बैठकीत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, सचिवपदी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडकेर होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JAN 2018

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात कर्मचारी बनले 'साहेब'

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील विविध पदांसाठी खुल्या प्रवर्गासाठी ३७जणांना सोमवारी पदोन्नती देण्यात आली. या सर्वांना नियुक्तीचे पत्रे प्रशासनाकडून देण्यात आली. दीर्घकाळ रखडलेली पदोन्नती झाल्यामुळे कर्मचाऱ्यांनी आनंद व्यक्त केला. २९ डिसेंबर १७ च्या राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ही पदोन्नती देण्यात आल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

उपकुलसचिव, सहायक अधीक्षक, वरिष्ठ सहाय्यक, लॅब टेक्निशियन, हवालदार, हेड माळी आदी पदांसाठी नियुक्ती पत्रे देण्यात आली. दिर्घकाळ खुल्या प्रवर्गातील पदोन्नती रखडली होती. त्यामुळे पदोन्नतीची सातत्याने मागणी केली जात होती. आज प्रशासनाने ३७जणांना कर्मचाऱ्यांचे साहेब केले, अशी भावना पदोनती झालेल्यांनी व्यक्त केली.

- खुल्या प्रवर्गासाठी ३७ जणांना पदोन्नती
- दीर्घकाळानंतर पदोन्नती
- शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार कार्यवाही

याबाबत प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ही कार्यवाही करण्यात आली. त्यांना नियुक्ती पत्रे तत्काळ दिली गेली आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JAN 2018
तरुण भारत

# खुल्या प्रवर्गासाठी ३७ जणांना पदोन्नती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विविध पदांसाठी खुल्या प्रवर्गासाठी ३७ जणांना सोमवारी पदोन्नती देण्यात आली. या सर्वांना नियुक्तीचे पत्र विद्यापीठ प्रशासनाकडून देण्यात आले.

**शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार विद्यापीठ प्रशासनाकडून कार्यवाही**

दिर्घकाळ रखडलेली पदोन्नती झाल्यामुळे कर्मचाऱ्यांनी आनंद व्यक्त केला. २९ डिसेंबर २०१७ च्या राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार ही पदोन्नती देण्यात आल्याचे विद्यापीठ प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. शिवाजी विद्यापीठातील उपकुलसचिव, सहायक अधीक्षक, वरिष्ठ सहायक, लॅब टेक्निशियन, हवालदार, हेड माळी आदी पदांसाठी कर्मचाऱ्यांना नियुक्तीपत्रे देण्यात आली. दीर्घकाळ खुल्या प्रवर्गातील पदोन्नती रखडली होती. पदोन्नतीची सातत्याने मागणी केली जात होती. मागणीची पुर्तता झाल्याने कर्मचाऱ्यांनी आनंद साजरा केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JAN 2018
लोकमत

# विद्यापीठातील ३७ जणांना पदोन्नती

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने खुल्या प्रवर्गातील ३७ कर्मचाऱ्यांना पदोन्नती सोमवारी दिली.

विद्यापीठ प्रशासनाने उपकुलसचिव, सहायक अधीक्षक, वरिष्ठ सहायक, हवालदार अशा विविध पदांवरील नियुक्तीची पत्रे कर्मचाऱ्यांना दिली. २९ डिसेंबर २०१७ च्या राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संबंधित पदोन्नतीबाबतची कार्यवाही केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JAN 2018
सकाळ

# 'सेट' परीक्षा २८ जानेवारीला

कोल्हापूर, ता. २२ : येत्या २८ जानेवारीला स्टेट एलिजिबिलीटी टेस्ट (सेट) परीक्षा होणार आहे. परीक्षेसाठी ७ हजार ४१६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, शिवाजी विद्यापीठासह विविध महाविद्यालये व शाळांत बैठक व्यवस्था केली आहे. १० ते ११.१५, ११.४५ ते १ व २.३० ते ५ या वेळेत पेपर होतील. शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र, तंत्रज्ञान, रसायनशास्त्र अधिविभागासह सायबर, न्यू, विवेकानंद, महावीर, शहाजी छत्रपती, शांतिनिकेतन, शाहू महाराज हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, प्रिन्सेस पद्माराजे गर्ल्स हायस्कूल, न्यू मॉडिल इंग्लिश स्कूल, न्यू हायस्कूल, एस. एम. लोहिया व कॉमर्स कॉलेजमध्ये बैठक व्यवस्था केली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JAN 2018
पुढारी

# सेट परीक्षा रविवारी; ७ हजार ४१६ परीक्षार्थी

**कोल्हापूर :** स्टेट एलिजिबिलिटी टेस्ट (सेट) परीक्षा रविवारी (दि.२८) होणार आहे. कोल्हापूर सेंटरमधून ७ हजार ४१६ परीक्षार्थींनी यासाठी फॉर्म भरले आहेत. शिवाजी विद्यापीठात तीन ठिकाणी, विवेकानंद कॉलेज, शहाजी कॉलेज, न्यू कॉलेज, महावीर कॉलेज, सायबर आदी ठिकाणी परीक्षा असणार आहे. परीक्षा सर्वांनी द्यावी, असे आवाहन विद्यापीठ सेंटरकडून करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JAN 2018
तरूण भारत

# विद्यापीठातील भूगोल विभागाला विकास विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांची भेट

**कोल्हापूर :** भुगोल दिनानिमित्त पाडळी येथील विकास विद्या मंदिरातील विद्यार्थ्यांना विद्यापीठातील भूगोल अधिविभागाच्या वतीने आमंत्रित करण्यात आले होते. या विद्यार्थ्यांना ओळख भौगोलिक माहिती प्रणालीची अंतर्गत माहिती दिली. अध्यक्षस्थानी भूगोल अधिविभाग प्रमुख डॉ. एस. एस. पन्हाळकर होते. विद्यार्थ्यांना आधुनिक भूगोलामध्ये होणाऱ्या तंत्रज्ञानाच्या वापरासंबधी प्रात्याक्षिकांद्वारे माहिती दिली. विद्यार्थ्याना विविध भौगोलिक उपकरणांची माहिती देऊन संशोधक विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भौगोलिक प्रतिकृती, छायाचित्रे व भित्तीपत्रका प्रदर्शन दाखवण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JAN 2018
तरुण भारत

# आय. टी. कंपनीच्या भरती प्रक्रियेला प्रतिसाद

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील सेन्ट्रल प्लेसमेंट सेलमार्फत टेक्नीट आय. टी. एनेबल्ड सर्वीसेस प्रा. लि. या कंपनीतील विषयतज्ज्ञ पदासाठी भरती प्रक्रियेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागातील भरती प्रक्रियेत ३८१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. रसायनशास्त्र विभागप्रमुख मा. डॉ. जी. एस. गोकावी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागातील सभागृहामध्ये झालेली भरती प्रक्रिया ही एम. एस्सी. (गणित, संख्याशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र), एम. ए. (इंग्रजी, अर्थशास्त्र), एम. कॉम. विषयांच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली होती. विद्यार्थ्यांसाठी प्रश्नोत्तरांचे सत्र आयोजित करण्यात आले होते. त्यानंतर सर्व उपस्थित विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा घेण्यात आली. या लेखी परीक्षेचा निकाल पंधरा दिवसांत जाहीर करण्यात येणार आहेत. सेन्ट्रल प्लेसमेंट अधिकारी डॉ. जी. एस. राशिनकर यांनी शिवाजी विद्यापीठाच्या प्लेसमेंट सेल मार्फत सुरु असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. टेक्नीट आय. टी. एनेबल्ड सर्विसेस प्रा. लि. या कंपनीच्या सि. ऑफिसर-ऑपरेशनस तेजस जगताप यांनी कंपनीच्या कार्यप्रणालीबाबत माहिती दिली. संख्याशास्त्र विषयाचे प्रा. डॉ. सोमनाथ पवार यांनी आभार प्रदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 JAN 2018
पुढारी

# महाविद्यालयातील 'जीएस' पदासाठी उद्या निवडणूक

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील अधिविभाग आणि संलग्नित महाविद्यालयांतील सचिवपदासाठीची (जीएस) निवडणूक बुधवारी (दि. २४) होणार आहे. निवडणुका गुणवत्तेनुसार म्हणजे जुन्या नियमावलीप्रमाणे होणार असल्याने यामध्ये फारशी चुरस दिसत नाही. या निवडणूक प्रक्रियेंतर्गत महाविद्यालय आणि विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी मंडळावरील विद्यार्थी प्रतिनिधीपदासाठी अर्ज करण्याची मुदत दि. १० जानेवारीपर्यंत होती. माघारीनंतर उमेदवारांना नोटीस आणि सचिवपदाच्या निवडणुकीची घोषणा १७ जानेवारीला झाली. त्यानुसार बुधवारी (दि. २४) जीएस निवडणूक होईल. त्यानंतर अध्यक्ष आणि सचिवपदासाठी दि. २७ फेब्रुवारीला निवडणूक होणार आहे, अशी माहिती विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी दिली. तीन वर्षांनंतर विद्यार्थी मंडळाच्या निवडीची प्रक्रिया होत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JAN 2018
तरुण भारत

# व्हॅल्युएशन प्रॉपर्टीज कोर्सच्या प्रमाणपत्रांचे वितरण

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या व्हॅल्युएशन ऑफ इम्मुव्हेबल प्रॉपर्टीजच्या सर्टिफिकेट कोर्स प्रमाणपत्र वितरण व परिसंवाद कार्यक्रम झाला. शिवाजी विद्यापीठाचा हा कोर्स डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या कॉलेजमधून सन २००५ पासून चालू असून, आजतागायत साधारण १२५ हून अधिक विद्यार्थ्यांनी हा कोर्स केला आहे.




**डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या व्हॅल्युएशन प्रॉपर्टीज कोर्सचा यशस्वी विद्यार्थी रविकिरण तोरसे यास शिवाजी विद्यापीठाने दिलेल्या प्रमाणपत्राचे वितरण करताना नेत्रदीप सरनोबत. डावीकडून निरंजन वायचळ, बलराम महाजन, सुभाष कुलकर्णी, ग. का. देऊसकर, प्रकाश देवलापूरकर व रमेश पोवार.**

मेळाव्यास हा कोर्स केलेल्या मुंबई, पुणे, नाशिक, अहमदनगर, सांगली, सातारा आणि कोल्हापूर या जिल्ह्यांतील माजी विद्यार्थी उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य शहर अभियंता इंजि. नेत्रदीप सरनोबत होते. सरनोबत यांनी डेक्कनला महानगरपालिकेस स्थावर मिळकत मूल्यांकनाबाबत सहकार्य करावे, ज्यामुळे महापालिकेत असलेले घरफाळा इत्यादीबाबतचे मूल्यांकनातील तांत्रिक बाबीबाबत सल्ला मिळून महापालिकेस कार्य करणे सोयीस्कर होईल. प्राप्त परिस्थितीत असणारे नियम व अटी व होणारी डेव्हलपमेंट याचा योग्य विचार करून महापालिकेस महाराष्ट्र स्तरावर एक उत्कृष्ट नगरपालिका म्हणून नाव होण्यासाठी महापालिका थिंक टँक समिती तयार करणे महत्त्वपूर्ण आहे व यासाठी डेक्कनने योगदान करावे, असे आवाहन त्यांनी केले. डेक्कनचे चेअरमन सुभाष कुलकर्णी यांनी प्रमुख पाहुण्यांची विनंती मान्य करून डेक्कन महापालिकेस सर्व प्रकारे सहकार्य करेल. यापूर्वी डेक्कनने रंकाळा तलावाजवळील इराणी खाणीतील गणेश विसर्जनाबाबत व रंकाळा तलाव शुद्धीकरणाबाबत सहकार्य केले होते.

कार्यक्रमात सर्व आजी व माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन आपल्या सध्याच्या व्यवसायातील अनुभवांचे आदान-प्रदान केले. भविष्यात एकमेकांशी संपर्क साधून सहकार्य करण्याचे विद्यार्थ्यांनी ठरविले. या कोर्सचे को-ऑर्डिनेटर इंजि. बलराम महाजन, विश्वस्त इंजि. रमेश पोवार यांनी उद्बोधनपूर्वक मार्गदर्शन केले. सचिव इंजि. गजानन देऊसकर उपस्थित होते. उपाध्यक्ष इंजि. निरंजन वायचळ यांनी आभार मानले.

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JAN 2018
पुण्यनगरी



हिरे महाविद्यालयातील कार्यशाळेत बोलताना प्रा. डॉ. प्रल्हाद एम. माने. सोबत डॉ. जी. एस. म्हांगोरे, प्रा. ए. जे. गोडसे व इतर.

# समस्या निर्माण होताच चिंतन होणे गरजेचे : माने

गारगोटी / प्रतिनिधी : सोशल मीडिया हा सामाजिक परिवर्तनासाठी जबाबदार घटक ठरत आहे. यातून सकारात्मक बदल घडवून आले पाहिजेत. सोशल मीडियातून सर्व क्षेत्रात सकारात्मक व नकारात्मक परिणाम होत आहेत. यातून काही समस्या निर्माण होतात. यावर चिंतन झाले पाहिजे, असे मत डॉ. प्रल्हाद माने यांनी व्यक्त केले.

येथील मौनी विद्यापीठाच्या कर्मवीर हिरे महाविद्यालयात सोशल मीडिया आणि सामाजिक परिवर्तन या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेत डॉ. माने प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जी. एस. म्हांगोरे होते. समाजशास्त्र विभाग व समाजकार्य विभागाने कार्यशाळेचे आयोजन केले होते. डॉ. यू. एस. आनंद यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. डी. के. पाटील यांनी स्वागत केले. उपप्राचार्य ए. जे. गोडसे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अरविंद चौगले यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रा. एस. बी. देसाई यांनी आभार मानले.